४० वर्षांची विश्वसनीय परंपरा...! सौंदर्याला तेज शुद्धतेचे!
BJD
बेलवलकर ज्वेलर्स
अविरत सेवा • शुद्ध सोने • खात्रीशीर दर • मनोवेधक डिझाईन्स • हॉलमार्क प्रमाणित
KISNA किसना डायमंड ज्वेलरी मिळेल
प्रोप्रा. दीपक रा. बेलवलकर
9422434501, 9890111021
कल्प कॉर्नर, कांबळी गल्ली, बाजारपेठ, कणकवली

■ २२ कॅरेट सोने दर : १,४६,४००/- ■ चांदी दर : २,७८,०००/-

शब्दांना सत्याची धार
# प्रहार
सिंधुदुर्ग • मंगळवार २४ फेब्रुवारी, २०२६
RNI Reg.No.: एमएएचएमएआर/२००८/३३७८७ • वर्ष २२ • अंक १०७ • पाने ८ • ₹ ५.००
www.prahaar.in epaper.prahaar.in



संजू सॅमसनच्या संधीसाठी अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, रिंकू सिंग रडारवर
पान ८

# राज्यात सहा महिन्यात तब्बल ९१ हजार ३३७ कोटींची गुंतवणूक

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांची अभिभाषणातून विधीमंडळात माहिती

**मुंबई (प्रतिनिधी)**

महाराष्ट्राचा देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात १३.५ टक्क्यांहून अधिक वाटा असून, २०२४-२५ या वर्षात राज्याला १ लाख ६४ हजार ८७५ कोटींची थेट परकीय गुंतवणूक प्राप्त झाली. ही देशातील एकूण गुंतवणुकीच्या ३९ टक्के आहे. २०२५-२६ च्या पहिल्या सहामाहीत ९१ हजार ३३७ कोटींची गुंतवणूक राज्यात आली, अशी माहिती राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सोमवारी विधानमंडळात दिली.

विधिमंडळाच्या २०२६ या वर्षातील पहिल्या अधिवेशनाची सुरूवात राज्यपालांच्या अभिभाषणाद्वारे झाली. त्यावेळी राज्यपाल देवव्रत बोलत होते. याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,



उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री आणि आमदार उपस्थित होते. राज्यपाल म्हणाले, राज्याची अर्थव्यवस्था २०४७ पर्यंत ५ ट्रिलीयन डॉलर्सपर्यंत वाढविण्यासाठी पायाभूत सुविधा, गुंतवणूक, आणि जनकल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या २०२६ मधील दावोस येथील परिषदेत सुमारे ३० लाख कोटींचे सामंजस्य करार करण्यात आले. त्यातून ४० लाख रोजगारनिर्मिती अपेक्षित आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'साठी व्हिजन मॅनेजमेंट युनिट स्थापन करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

'महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५'अंतर्गत १७.५० लाख कोटी गुंतवणूक आणि ५० लाख रोजगाराचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. बांबू, रत्न-आभूषण, एव्हीजीसी-एक्सआर तसेच जागतिक सामर्थ्य केंद्र धोरण जाहीर करण्यात आले. गडचिरोलीला स्टील हब तर पूर्व विदर्भाला स्टील कॉरिडॉर म्हणून विकसित करण्याची योजना आहे. 'महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता व नवोन्मेष धोरण २०२५'द्वारे पुढील पाच वर्षांत १.२५ लाख उद्योजक व ५० हजार स्टार्टअप्सना सहाय्य देण्याचे उद्दिष्ट आहे, अशी माहिती राज्यपाल देवव्रत यांनी दिली.

**सागरी क्षेत्रात ५६ हजार कोटींचे करार**

राज्याच्या आर्थिक व औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी ४ हजार ४७८ कोटींच्या १४७ प्रमुख रस्ते प्रकल्पांना मंजुरी (पान २ वर)

# अजितदादा म्हणजे महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री!

- शोकप्रस्ताव मांडताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावूक
- दादांच्या जाण्याने 'पोकळी' शब्दाची खरी व्याख्या कळली

**मुंबई (प्रतिनिधी)**

"वक्तशीरपणा हा अंगभूत गुण असलेले अजित पवार कधीच वेळ चुकवत नसत. ते खूप मोठी इनिंग खेळतील, असे दिसत असताना, दादांनी पहिल्यांदाच आयुष्याचे टायमिंग चुकवले. दादा सहावेळा उपमुख्यमंत्री झाले, सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा मान त्यांना मिळाला. अनेकवेळा ते म्हणायचे, मी कधीतरी मुख्यमंत्री होईन, पण उपमुख्यमंत्री म्हणून मी कायम राहीन. पण मी आज आवर्जून नमूद करेन, की "अजितदादा पवार वॉज दी बेस्ट चिफ मिनिस्टर महाराष्ट्र नेव्हर हॅड. अजितदादा म्हणजे महाराष्ट्राला न लाभलेले सर्वोत्कृष्ट मुख्यमंत्री होते", अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत आपल्या भावना व्यक्त केल्या.



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्र्यांनी सोमवारी विधानसभेत शोकप्रस्ताव मांडला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह सर्व मंत्री आणि आमदार उपस्थित होते. (पान २ वर)


# दहशतवाद्यांवर भारताचा 'प्रहार'!

- देशाचे पहिले दहशतवादविरोधी धोरण जाहीर
- 'झिरो टॉलरन्स' ते 'आर्थिक रसद'वर टाच
- दहशतवादाविरोधात सात कलमी रणनीती
- सायबर सुरक्षा आणि तंत्रज्ञानावर देणार भर

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

देशाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेला असलेल्या आव्हानांचा मुकाबला करण्यासाठी केंद्र सरकारने सोमवारी 'प्रहार' या नावाखाली भारताचे पहिले अधिकृत दहशतवादविरोधी धोरण जाहीर केले. झिरो टॉलरन्स म्हणजेच दहशतवादाबाबत शून्य सहिष्णुता हे या धोरणाचे मुख्य सूत्र असून, गुप्तचर यंत्रणांवर आधारित प्रतिबंधात्मक कारवाई आणि दहशतवाद्यांच्या आर्थिक रसद पुरवठ्यावर पूर्णपणे टाच आणणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे.

गृह मंत्रालयाने प्रसिद्ध केलेल्या या ऐतिहासिक दस्तऐवजात दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी सात प्रमुख स्तंभांवर आधारित



बहुस्तरीय रणनीती मांडण्यात आली आहे. या धोरणामध्ये दहशतवाद रोखणे, तात्काळ प्रतिसाद देणे, अंतर्गत क्षमतांचे एकत्रीकरण, मानवी हक्क आणि कायद्याचे राज्य, दहशतवादाला खतपाणी घालणाऱ्या परिस्थितीचे निर्मूलन, आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्नांची सांगड घालणे आणि संपूर्ण समाजाच्या सहभागातून पुनर्वसन व लवचिकता निर्माण करणे या बाबींवर भर दिला आहे.

शेजारील देशांमधील अस्थिरतेचा फायदा घेऊन काही देश दहशतवादाचा वापर सरकारी धोरणाचे साधन (पान २ वर)

# वन विभागाच्या अखत्यारीतील तलाव 'मत्स्यव्यवसाय'कडे वर्ग करा

**मंत्री नितेश राणे यांची वनमंत्र्यांकडे मागणी**

## मत्स्य तलावांच्या सुयोग्य नियोजनासाठी मंत्री नितेश राणे आणि वनमंत्री गणेश नाईक यांची संयुक्त बैठक

**मुंबई (वृत्तसंस्था)**

वन विभागाच्या अखत्यारीतील मत्स्य तलाव हे मत्स्यव्यवसाय विभागाकडे वर्ग करण्याची मागणी मंत्री नितेश राणे यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे केली. दरम्यान, अनधिकृत मासेमारी मोठ्या प्रमाणात होत असल्याने शासनाचा महसुली तोटा होत असल्याचे नमूद करून लहान व मोठ्या माशांचे व्यवस्थापन आवश्यक असल्याचे मत मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांनी सोमवारी मंत्रालयात झालेल्या बैठकीत व्यक्त केले.

राज्यातील बिगर संरक्षित वनक्षेत्रातील जलाशयांमध्ये शासन



मान्यता प्राप्त मच्छीमार सहकारी संस्थांमार्फत मत्स्यव्यवसायाला परवानगी देण्याबाबत मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे आणि वनमंत्री गणेश नाईक यांची संयुक्त बैठक सोमवारी मंत्रालयात पार पडली. या बैठकीस वने विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक म्हैसकर यांच्यासह वने व मत्स्यव्यवसाय विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. वन विभागाच्या अखत्यारीतील मत्स्य तलावामध्ये (पान २ वर)

# अल्पवयीन मुलीवर अत्याचारप्रकरणी नराधमाला २० वर्षांचा तुरूंगवास

## सिंधुदुर्ग विशेष न्यायालयाचा निकाल

**सिंधुदुर्गनगरी (प्रतिनिधी)**

आंब्याच्या बागेत नेऊन अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी विष्णू प्रसाद डिल्ली कृष्ण न्यौपाने (६०, सध्या रा. कोचरा, वेंगुर्ला मूळ रा. नायरनमतलेस, पाल्पा, नेपाळ) याला दोषी ठरवत विशेष न्यायाधीश श्रीम. व्ही. एस. देशमुख यांनी २० वर्षे सश्रम कारावास आणि २० हजार रुपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे. यातील ५ हजार रुपये रक्कम पीडितेला देण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. सरकार पक्षातर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी अभियोक्ता रुपेश देसाई यांनी काम पाहिले.



पीडित अल्पवयीन मुलगी ही ५ मार्च २०२५ रोजी आरोपी विष्णू यांच्याकडे मोबाईलवर कार्टून पाहण्यासाठी आली होती. यावेळी आरोपीने पीडितेला जेवण देऊन दुपारी जंगलमय भागातील बागेत नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला होता. तसेच घडलेला प्रकार कोणाला सांगू नये आणि सांगल्यास मारण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईच्या सांगण्यावरून वेंगुर्ला पोलीस ठाण्यात ७ मार्च २०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला (पान २ वर)

# २२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका लांबणीवर

## आरक्षणाचा पेच कायम; ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना सर्वोच्च न्यायालयाचा 'ब्रेक'

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतील ओबीसी आरक्षणावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यानुसार राज्यातील ५० टक्के आरक्षण मर्यादा ओलांडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास सर्वोच्च न्यायालयाने मनाई केली आहे. राज्यात आता २२ जिल्हा परिषद आणि त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित राहणार आहेत. सर्वोच्च न्यायालयात पार पडलेल्या सुनावणीत अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रलंबित निवडणूक



घेण्यास परवानगी देण्याची मागणी राज्य सरकारकडून करण्यात अली होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने उर्वरित जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका घेण्यास मनाई केली आहे.

राहुल रमेश वाघ विरुद्ध केंद्र आणि महाराष्ट्र सरकार या याचिकेवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने बांठिया समितीपूर्वीच्या स्थितीनुसार निवडणुका घेण्याचे आदेश दिले होते. मात्र राज्य निवडणूक आयोगाने आरक्षणाची ५० टक्क्यांची कायदेशीर मर्यादा ओलांडल्याने २२ जिल्हा परिषदा आणि त्यांतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या निवडणुकांना स्थगिती देण्यात आली आहे. सद्यस्थितीत १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुका पार पडल्या असल्या, तरी आरक्षणाच्या या तांत्रिक पेचामुळे उर्वरित २२ जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका आता अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहण्याची दाट शक्यता (पान २ वर)

# सीसीटीव्ही बंद आढळल्यास केंद्र संचालकासह प्राचार्य अन् समन्वयकावर कारवाई

## पेपर फुटीवर शिक्षण मंडळाचा मोठा निर्णय

**मुंबई (वृत्तसंस्था)**

बारावीचे भौतिकशास्त्र व रसायनशास्त्राचे दोन पेपर फुटल्यानंतर महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, प्रत्येक परीक्षा केंद्रावर सीसीटीव्ही यंत्रणा पूर्णवेळ कार्यान्वित ठेवणे बंधनकारक करण्यात आले आहे. यात फुटेजमध्ये काही गडबड आढळल्यास संबंधित केंद्र संचालकांसह इतर अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

नागपूर येथील एका परीक्षा केंद्रावर बारावीचे फिजिक्स व केमेस्ट्री हे दोन पेपर फुटले होते. यामुळे परीक्षा पारदर्शक व कॉपीमुक्त वातावरणात घेण्याच्या बोर्डाच्या तयारीचा फज्जा उडाला होता. या प्रकारामुळे राज्यभरात खळबळ माजली असताना आता बोर्डाने असे प्रकार टाळण्यासाठी सीसीटीव्हींच्या बाबतीत अधिक कठोर निर्णय घेतला आहे. बोर्डाच्या निर्णयानुसार, दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी व कॉपीसारख्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सर्वच परीक्षा केंद्रांवर सीसीटीव्ही लावणे बंधनकारक आहे. तसेच हे सीसीटीव्ही बंद असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित केंद्रप्रमुख, प्राचार्य व समन्वयक यांच्यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे. (पान २ वर)

# लाडक्या बहिणींची 'होळी' गोड!

## जानेवारी महिन्याचा हप्ता खात्यावर जमा होण्यास सुरुवात

**मुंबई**

महाराष्ट्र राज्यातील लाखो महिला ज्या जानेवारी महिन्याच्या हप्त्याची आतुरतेने वाट पाहत होत्या, त्यांच्यासाठी आनंदाची बातमी आहे. २३ फेब्रुवारीच्या सायंकाळीपासून जानेवारीचा हप्ता जमा झाला आहे.

राज्य सरकारने १८ फेब्रुवारी २०२६ रोजी जारी केलेल्या नवीन जीआरनुसार, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या जानेवारी महिन्याच्या हप्त्यासाठी ९८.४५ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. (पान २ वर)

# भक्ती आणि परंपरेचा अनोखा संगम; अवघे गाव झाले 'निर्मनुष्य'! वायंगणी ग्रामस्थांचा तीन दिवस वेशीबाहेर मुक्काम

- देवपळणीनंतर झाली गावपळण : ग्रामदेवते सोबत ग्रामस्थांचेही तळ हलले
- आता तीन दिवस तीन रात्री देवासमोर निसर्गातला उत्सव





**अर्जुन बापर्डेकर (आचरा)**

उत्तर रात्री ग्रामदेवता गावच्या वेशीबाहेरील नियोजित स्थळी नेल्यानंतर वायंगणी गावच्या गावपळणीला सोमवारी दुपारपासून सुरुवात झाली आहे. मिळेल त्या वाहनाने तर काही जण गुराढोरांसह आपल्या घरदार बंद करून घराला माडाच्या झावळांचे झाप बांधून वायंगणी गावच्या वेशीबाहेर रवाना होत होते. दुपारी तीन नंतर सुमारे दिड दोन हजार लोकवस्तीचे नेहमी गजबजलेले वायंगणी गाव संपूर्ण निर्मनुष्य झाले. आता तीन दिवस तीन रात्री गजबज वाढणार आहे ती वायंगणी गावच्या वेशीबाहेर. श्री देव रवळनाथाच्या हुकूमावरून दर तीन वर्षांनी वायंगणी गावची ही अनोखी देवपळण व गावपळण परंपरा पाळली जात आहे.

सोमवारी पहाटेच देवपळण झाल्यावर सकाळपासूनच ग्रामस्थांनी पाळीव जनावरे, कोंबड्या वेशीबाहेर नेण्यासाठी (पान २ वर)

# भारतीय सिनेमाचा जागतिक स्तरावर डंका

- मणिपुरी चित्रपट 'बूंग'ला प्रतिष्ठेचा 'बाफ्टा' पुरस्कार
- पुरस्कार जिंकल्याबद्दल पंतप्रधानांनी 'बूंग' चित्रपटाच्या टीमचे केले अभिनंदन

**लंडन (वृत्तसंस्था)**

जागतिक चित्रपटसृष्टीत अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'ब्रिटीश अकादमी फिल्म आणि टेलिव्हिजन आर्ट्स' पुरस्कारांची घोषणा लंडन येथे करण्यात आली. या पुरस्कार सोहळ्यात भारताच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, मणीपुरी भाषेतील 'बुंग' या चित्रपटाला 'सर्वोत्कृष्ट बाल आणि कौटुंबिक




चित्रपट' या गटात गौरवण्यात आले आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ईई बाफ्टा' चित्रपट पुरस्कारांमध्ये बाल आणि कौटुंबिक (पान २ वर)